जा.क्र.नांवाशमनपा/नसका/सिआर-30/2018
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांकः-    12.02.2019

**दिनांक 14.02.2019 रोजी आयोजीत करण्यात आलेली मनपा सर्वसाधारण सभेची पुरवणी विषय पत्रिका**

**आयुक्त यांच्याकडून प्राप्त कार्यालयीन प्रस्ताव**

**विषय क्रं. 01**

राष्ट्रीय कार्यक्रम राबविण्यासाठी महानगरपालिकेस कंत्राटी पध्दतीने एकत्रीत वेतना वरील **श्री सुहास रघुनाथराव सोनुले** प्रोग्राम मॅनेजर यांना रुपये 18,000/- वर संबंधीतांच्या सेवेची मुदत दिनांक 23.01.18 रोजी संपलेली असुन त्यांच्या सेवेत दिनांक 31.12.18 रोजीचा तांत्रीक खंड देवुन दि. 01.01.2019 ते 29.06.2019 पर्यंत मुदतवाढ देणे बाबत

**विषय क्रं. 02**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत शिख धर्म संस्थापक व पहीले शिखगुरु श्री गुरुनानक देवजी यांची 550 वी जयंती पुर्ण जगभर नोव्हेंबर 2019 मध्ये साजरी केली जाणार आहे त्यामुळे संपूर्ण जगात शिख धर्मीयांची दक्षिण काशी म्हणुन ओळखल्या जाणा-या गुरुव्दारा सभोवतालचा परीक्रमा मार्ग व सभोवतालचे मार्ग नव्याने करणे अंदाजीत खर्च रुपये 10.00 कोटी लागणार असुन सदर निधी शासनाकडे मागणी करण्याास मान्यता देणे

**विषय क्रं. 03**

शांतीनगर चौरस्ता, जुना गंज, बाबुमियाँ हॉटेल ते श्री जावेद हॉटेलवाले यांच्या घरापर्यंत (मुर्गी मार्केट) रस्त्याची पुर्नबांधणी करणे ऐवजी Z.P. शाळा ते महमद होटल ते मनियार गल्ली इतवारा मुख्य रस्त्यापर्यंत डांबरी रस्ता करण्यास मान्यता देणे बाबत.

**विषय क्रं. 04**

इतवारा दर्गाह नईम भाई भुसार लेन ते भारत मेडीकल पर्यंतच्या रस्त्याची पुर्नबांधणी करणे ऐवजी Z.P. शाळा ते इतवारा हनुमान मंदिरा पर्यंत डांबरी रस्त्याचे मजबुतीकरण करण्यास मान्यता देणे बाबत

**विषय क्रं. 05**

नांदेड शहरात वाहतुक सुरळीत ठेवण्याच्या दृष्टीने JNNURM योजने अंतर्गत बांधण्यात आलेल्या रस्ता रुंदीच्या वापरमध्ये बदल करुन उपाय योजना करणे बाबत.

**स. सदस्या मार्फत आलेले प्रस्ताव/सुचना**

**विषय क्रं. 06** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील बेकायदा जाहीराती, होर्डींग, घोषणा फलक, पोस्टर्स, भिंतीवरील पेन्टींग बाबत निर्बंध घालून शहराचे सौंदर्य अबाधीत राखणे हे आमचे कर्तव्य आहे. महापालिकेच्या परवागीने उभारण्यात आलेल्या लहान-मोठया जाहीराती, होर्डींग, खाजगी इमारतीवरील मोबाईल टॉवर यांचे तातडीने स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात यावे. धोकादायक ठिकाणावरील व झेब्रा क्रॉसिंग जवळील होर्डींग, मोबाईल टावर काढून टाकण्याची कारवाई करण्यात यावी. नागरीकांच्या जिवीतास कोणत्याही प्रकारची इजा होणार नाही याची खबरदारी घेवुन महानगरपालिकेच्या वतीने वरील प्रकारच्या परवानगी कायम करतांना करात (टॅक्स) मोठी वाढ करण्यात यावी.

**सुचक**:- बापुराव गजभारे **अनुमोदक** :- महेंद्र पिंपळे

**विषय क्रं. 07** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत खडकपुरा, नागरीकांच्या आरोग्यच्या दृष्टीने कोणतेही अद्यावत जवळ कोणतेही रुग्णालय नसल्याने तसेच या भागातील नागरीक हे अत्यंत गरीब व आर्थीक दृष्टया दुर्बल घटकातील असल्याने यांच्या आरोग्यासाठी टाकी लगतच्या मोकळया जागेत एक UCSC या योजने अंतर्गत प्रसुती केंद्र चालु करण्यासाठी अनुदान प्राप्त करुन घेण्यासाठी केंद्र व राज्य शासना मार्फत सुरु करण्यासाठी मान्यता देणे.

**सुचक** :- दिक्षा धबाले, स. शोएब अफाख स. मजहर हुसेन **अनुमोदक** :- ज्योत्सना गोडबोले.

**विषय क्रं. 08** **प्रस्ताव**

मनपाकेच्या वतीने सिडको येथील वृत्तपत्र वितरकांसाठी अण्णाभाऊसाठे पुतळयासमोरील पाण्याच्या टाकीलगत टिन शेड उभारुन जागा उपलब्ध करुन देणे बाबत.

**सुचक** :- विनय पाटील **अनुमोदक** :- श्रीनिवास जाधव

**विषय क्रं. 09** **प्रस्ताव**

श्रीमती आनंद वैद्य (आनंदी विकास) यांची जिल्हा परिषद नांदेड येथून नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर शिक्षीका पदी समायोजनाने नियुक्ती करुन सेवासातत्य देण्यास ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचक** :- सौ. शैलजा किशोर स्वामी, प्रशंत विठ्ठल तिडके **अनुमोदक** :- सौ.अपर्णा ऋषीकेश नेरलकर, आनंद चव्हाण

**विषय क्रं. 10** **प्रस्ताव**

श्री गौतम पोचिराम कसबे, सह शिक्षक, केंद्रीय प्राथमिक शाळा, वजिराबाद नांदेड आस्थापनेवर सहशिक्षीका, सौ. सगिता गणेश चक्रवार, सह शिक्षक, जि.प.प्रा.शा वारंग टाकळी केंद्र मंगरुळ ता. हिमायतनगर जि. नांदेड या दोन्ही सह शिक्षकांच्या विनंती अर्जानुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड येथे शिक्षण आस्थापनेवर एकतर्फी बदली करुन त्यांची सेवा महापालिकेत वर्ग करण्यास हि मनपा सर्व साधारण सभेसमोर सादर

**सुचक** :- उमेशसिंह अशोकसिंह चव्हाण **अनुमोदक** :- ज्योती सुभाष रायबोले

**विषय क्रं. 11** **प्रस्ताव**

मनपा हद्दीतील महात्मा गांधी रोडला जोडणारा रस्ता कालापुल ते महात्मा गांधी रोड हा रस्ता 50 फुटाचा रुंद रस्ता बांधून रस्त्याच्या दोन्ही बाजुने 15 फुट खोल दुकाने हे BOT तत्वावर अथवा रस्ते अनुदान / 14व्या वित्त आयोग / मनपा निधी / शासन निधी मधुन बांधण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते. सदर रस्त्याच्या बांधकाम करतांना बांधीत होणा-या रहिवाशांना मनपा मालकीच्या घरकुल मधील रिकामे घरकुल देण्यास तसेच झालेल्या अतिक्रमण तात्काळ काढण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यता येतो.

**सुचक:-** रावत भानुसिंह **अनुमोदक** :- स. शेर अली

**विषय क्रं. 12** **प्रस्ताव**

शहरातील ज्या मालमत्ता धारकांनी अनाधिकृत बांधकाम Layout पाडून प्लॉट विलकलेले आहे अथवा बांधकाम करुन घेतलेले आहे अशांना गुंठेवारी योजने अंतर्गत नियमीत करुन घेण्यास शासनास शिफारस करण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**सुचक** :- अरशीया कौसर मो. हबीब **अनुमोदक** :- शमीम बेगम शेख जावीद

**विषय क्रं. 13** **प्रस्ताव**

नावाशमनपा नांदेड पाणी पुरवठा विभागा अंतर्गत पाणी पट्टी वसुलीचे काम चालु आहे नळ जोडणीचा डाटा बिघडला (नादुरुस्त) झाला आहे. त्यामुळे नागरीकांना जास्तीची मागणी जात आहे. त्यामुळे पाणी पट्टीची मागणीची रक्कम फुगीर दिसत आहे. त्याकरिता नागरीकांच्या ज्या समस्या आहेत त्या बाबत तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. अशा प्रकारच्या सर्वदुरुस्तीच्या बाबी लक्षात घेवुन पाणी पुरवठा विभागास दुरुस्तीचे अधिकार प्रदान करण्यात याव्यात या चालु आर्थीक वर्षात आतापर्यंत रुपये 16,54,257/- एवढया रक्कमेचे समायोजन करण्यात आले असुन यापुढे हा आकडा जास्त प्रमाणात वाढविण्याची शक्यता आहे. करिता उपरोक्त प्रमाणे सर्व प्रकारच्या दुरुस्त्या करण्याचे अधिकार पाणी पुरवठा विभागास देण्यासाठी प्रशासकिय मान्यता हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचक** :- आनंद चव्हाण, किशोर स्वामी **अनुमोदक** :- मो. साबेर चाऊस

**विषय क्रं. 14** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील निवासी व वाणिज्य पाणी पट्टी वसुलीचे काम मागील सालसन 2015-16, 2016-17, 2017-18 व 2018-19 चे पाणी पट्टी वर्षनिहाय किती होती व वर्षनिहाय किती वसुली करण्यात आली व किती थकबाकी आहे याची माहिती तात्काळ महासभेसमोर सादर करणे तसेच पाणीपटटी वेळेवर वसुली होत नसल्यास त्याची जबाबदारी निश्चित करणे. तसेच पाणी पट्टीची वसुली स्पटेंबर-18 पासुन माहिती देईपर्यंतची चालु वर्षाची व थकबाकी किती वसुली करण्यात आली याची वेगळयाने माहिती सादर करणे पाणीपट्टी वसुली मध्ये निष्काळजीपणा करणा-या अधिका-यांवर जबाबदार निश्चित करुन त्यांचे विरुध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यास हि मनपा सर्वसाधारण ससभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक**:- फारुख हुसेन बदवेल, अ. शमीम अब्दुल्ला, सय्यद शोएब **अनुमोदक** :- शहाणे अल्का,पुजा पवळे, अ. लतीफ अ. मजीद, अ. रशीद

**विषय क्रं. 15** **प्रस्ताव**

नावाशमनपाकेसाठी नगरविकास विभागाच्या दिनांक 23 मे 2018 च्या अधिसुचनेव्दारे ड वर्ग महापालिकेत समावेश असलेल्या मनपाकेतील मुख्यलेखाधिकारी या पदाचा दर्जा उपसंचालक लेखा वित्त विभागाकडुन प्रतिनियुक्तीव्दारे भरण्याबाबत सुचित केले आहे.महापालिकेत मुख्यलेखा परिक्षक हे पद रिक्त आहे. सध्या सदरपदावर श्रीमती शोभा वाघजी मुंडे लेखाधिकारी वेतनश्रेणी कार्यरत आहे. श्री स. हं. कंदेवार मुख्यलेखाधिकारी म्हणुन महापालिकेतील प्रतिनियुक्तीचा कालावधी जवळपास पुर्ण झालेला आहे. सदरील दोन्ही पदावर शासनाच्या वित्त विभागाकडील उपसंचालक दर्जाचा अधिका-याची प्रतिनियुक्ती नियुक्ती करण्यासाठी व तो पर्यंत या पदाचा अतिरिक्त पदभार वित्त विभागाकडील समकक्ष संवर्गातील अधिका-यांकडे सोपविण्यासाठी शासनाच्या नगरविकास विभाग व वित्त विभागास तात्काळ शिफारस करण्यात यावी. तसेच वरील दोन्ही अधिका-यास महापालिकेच्या प्रतिनियुक्तीच्या सेवेतुन तात्काळ कार्यमुक्त करण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते समंत करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यता येतो.

**सुचक** :- नागेश गोविंद कोकुलवार, स. शेर अली महेबुब अली, दिक्षा कपिल धबाले, अ. शमीम अब्दुल्ला

**अनुमोदक** :- मसुद अहेमद खान, फारुख हुसेन बदवेल, अ. लतीफ अ. मजीद, सय्यद शोऐब हुसेन, सौ. गितांजली हाटकर, साबेर चाऊस नासेर चाऊस, राजेश यन्नम.

**विषय क्रं. 16** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील कार्यरत असलेले वरिष्ठ लिपीक श्री दयानंद लोकाजी जोंधळे हे दिनांक 31.03.2019 रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत त्यांचा कार्यालयीन कामकाजाचा दिर्घ अनुभव व काम करण्याची इच्छा पाहता संबंधीतास वरिष्ठ लिपीक यांना मानधनावर मनपा सेवेत सामावुन घेणे करिता ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचक :-** राजेश लक्ष्मीनारायण यन्नम, उमेश चव्हाण, शबाना बेगम मो.नासेर, अ. रशीद अ. गणी, अब्दुल फहीम, ज्योती किशन कल्याणकर, सय्यद शोऐब, नागनाथ गड्डम.

**अनुमोदक:-** अ. शमीम अब्दुल्ला, मो. साबेर चाऊस, अ. हफीज अ. करीम, अ. लतीफ अ. मजीद, आयेशा बेगम शे.असलम (बाबुभाई खोकेवाले)

**विषय क्रं. 17** **प्रस्ताव**

सालसन 2016 मध्ये प्रशासना तर्फे कर्मचारी आकृतीबंध व सेवाप्रवेश नियमाच्या प्रस्तावा बाबत शासन निर्देशानुसार केलेली सविस्तर कार्यवाही सर्वसाधारण सभेसमोर सादर करण्यात आली होती. सर्वसाधारण सभेने याप्रस्तावात अल्पशः दुरुस्ती करुन प्रस्ताव त्वरीत शासनास पाठविण्याबाबत मा. महापौर व आयुक्त यांना अधिकार प्रदान केले होते.

कक्ष अधिकारी यांनी महापालिकेस दिनांक 04.12.18 रोजी शासनाकडे सादर केलेला एकत्रीत पदाचा आकृतीबंध व सेवाप्रवेश नियमाचा प्रस्ताव हा विभागवार करुन सादर करण्यास कळविले आहे. त्यानुसार आदर्श आचारसंहिता लागण्यापुर्वी सदरचा प्रस्ताव तात्काळ मंजुर होण्यासाठी तातडीने विभागवार प्रस्ताव शासनास पाठविणे बाबत

**सुचक** :- आनंद चव्हाण, अ. हफीज अ. करीम **अनुमोदक** :- उमेश चव्हाण

**विषय क्रं. 18** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका आस्थापनेवरील मा. आयुक्त, मा. अतिरिक्त आयुक्त हे पद मंजुर असुन सदरील पदावर शासना मार्फत प्रतिनियुक्ती भरण्यास मान्यता देण्यात येते. महापालिकेच्या आस्थापनेवर प्रतिनियुक्तीवर पाठविण्यासाठी राज्य शासनाने अधिसुचना प्रसिध्द केलेली नाही. तसेच अशा अधिसुचनेस राज्य विधान सभेचा किंवा विधान परिषदेची मंजुरी घेतलेली नाही म्हणुन नांदेड वाघाळा शहर महापालिकेच्या आस्थापनेवर मुख्यलेखाधिकारी, लेखाधिकारी, उपआयुक्त, सहाय्यक आयुक्त, नगररचनाकार, सहाय्यक संचालक नगररचनाकार, शिक्षणाधिकारी या पदावर प्रतिनियुक्तीने पाठविलेले अधिकारी राज्य शासनाच्या त्यांच्या खात्यात पाठविण्यात मान्यता देण्यात येते सदरील पदे पदोन्नतीने अथवा सरळसेवेने भरण्यासाठी हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक** :- स. शेर अली महेबुब अली, अ. शमीम अब्दुल्ला, रेहाना बेगम चाँद पाशा कुरेशी, अ. लतीफ अ. मजीद, सय्यद शोऐब हुसेन, दुष्यंत सोनाळे

**अनुमोदक:-** अ. हफीज अ. करीम, साबेर चाऊस नासेर चाऊस, शबाना बेगम मो. नासेर, गंगाबाई मल्हारी, राजेश लक्ष्मीनारायण यन्नम

**विषय क्रं. 19** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत करबला व बारा इमाम मन्यार गल्ली कब्रस्तान व शमशानभुमिच्या संचिका गेल्या पाच सहा महिण्यापासुन प्राथमिक मान्यता करिता, मा. आयुक्त यांच्याकडे अनेक वेळा मंजुरीसाठी आली असता सदरच्या संचिका अनेक अधिका-यांच्या अभिप्रायासाठी वारंवार पाठविण्यात येते त्यामुळे नागरीकांच्या भावनाशी खेळण्यात येते की काय? यावरुन असे दिसते संचिका आज पर्यंत झाली नाही तरी तात्काळा संचिका मान्य करावी अन्यथा रद्द करावी.

**सुचक** :- अ. शमीम अब्दुल्ला साब **अनुमोदक** :- अ. लतीफ अ. मजीद, शबाना बेगम मो. नासेर

**विषय क्रं. 20** **प्रस्ताव**

महाराष्ट्र जिवन प्राधिकरण मंडळ नांदेड यांनी पाणी पुरवठयांच्या कामासाठी दिलेल्या अहवाल व निर्णयावर अमलबजावणी करण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक :-** गाडीवाले संदिपसिंघ, अ. रशीद अ. गणी **अनुमोदक :-** राजेश यन्नम, उमेशसिंह चव्हाण

**विषय क्रं. 21** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत सध्या पाण्याची तिव्र टंचाई येण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच गोदावरी नदिच्या शंकर जलाशया मध्ये पाण्याची पातळी दिवसांदिवस कमी होत आहे. त्या अनुषंगाने महानगरपालिका हद्यीत दुष्काळ पाणी टंचाई योजना राबविण्यासाठी राज्य शासनाकडे टंचाई उपाय योजना अंतर्गत निधी राज्य शासनाकडुन उपलब्ध करुन घेण्यासाठी शिफारस करावे. तसेच जिल्हा नियोजन समिती नांदेड मार्फत शिफारस करण्यासाठी मान्यता देण्यात येते.

**सुचक :-** गाडीवाले संदिपसिंघ, अ. रशीद अ. गणी **अनुमोदक :-** राजेश यन्नम, उमेशसिंह चव्हाण

**विषय क्रं. 22** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका आणिबाणी विभाग मुख्य अग्निशमन विभाग अस्तित्वात असुन जुन्या नांदेड शहरात उप अग्निशमन केंद्र सुरु करणे आवश्यक आहे. त्यामुळे मुख्य अग्निशमन विभाग व जुना नांदेड शहरात उप अग्निशमन केंद्रासाठी आवश्यक असणारे पदे जसे फायरमन, ड्रायव्हर ऑपरेटर, इतर पदे सरळसेवाने अथवा कंत्राटी पध्दतीने विहित प्रक्रिया अवलंबुन तात्काळ भरण्यास मान्यता देते.

**सुचक** :- रावत भानुसिंह गयादिनसिंह **अनुमोदक**:- स. शेर अली, म. मसुद अहेमद खान, राजेश यन्नम, अ. लतीफ अ. मजीद, फारुख हुसेन बदवेल, आयेशा बेगम शे. असलम

**विषय क्रं. 23** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरकपालिका सर्वसाधारण सभेने ठराव क्रमांक 74 दिनांक 19.07.2018 अन्वये मनपाकेच्या जागेवर जाहिराती बाबत परवानगीचे नियम व अटी निश्चिती चा प्रस्ताव महासभे समोर सादर करुन सभेने दिलेल्या निर्णयानुसार कार्यवाही करण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते

**सुचक** :- स. विरेंद्रसिंघ गाडीवाले **अनुमोदक** :- आनंद चव्हाण

**विषय क्रं. 24** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरकपालिका मालकीच्या संकुलातील गाळे भाडेकरुन व पोटभाडेकरु यांच्या नावावर करण्यास तिन महिण्यासाठी अभय योजना सुरु करण्यासाठी हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक** :- अ. हफीज अ. करीम **अनुमोदक** :- शोएब हुसेन स. मजहर हुसेन

**विषय क्रं. 25** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत रिलायन्स कंपनी मार्फत विविध प्रभागात रस्ते खोदुन केबल टाकण्याचे काम करण्याचे आदेश संबंधीत एजन्सीला प्रशासना मार्फत देण्यात आले आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 79 (क) व (ड) चे उल्लंघन करणारे आहे म्हणुन रिलायन्स कंपनीस दिलेली परवानगी आहे त्या स्थितीत रद्द करण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचक** :- आनंद चव्हाण **अनुमोदक** :- अ. सत्तार अ. गफुर

**विषय क्रं 26** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजने अंतर्गत मा. जिल्हा प्रशासन अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड यांचे पत्र क्रं. 2018/नपाप्र/टे-6/लोअसानावसु/2018-19/सिआर-46 दिनांक 18.12.2018 व जिल्हा प्रशासन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड यांचे पत्र जा.क्रं. 2018/नपाप्र/टे-6/लोअससानावसु/2018-19/सिआर-46 दिनांक 16.01.2019 अन्वये सालसन 2018-19 साठी रुपये 15.66 कोटीची निधी प्राप्त झाले असुन सदरील प्राप्त निधी अंतर्गत मनपा हद्दीत साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजने अंतर्गत कामांची निश्चिती करण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक** :- आनंद चव्हाण, स. विरेंद्रसिंघ गाडीवाले **अनुमोदक** :- तेहरा अमितसिंह

**(मा. महापौर यांच्या मान्यतेने)**

**स्वाक्षरीत/-**
**(स. अजीतपालसिंघ संधु)**
**नगरसचिव**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड**